**International Journal of Advance and Applied Research**
www.ijaar.co.in
**ISSN – 2347-7075** **Impact Factor – 7.328**
**Peer Reviewed** **Bi-Monthly**
**Vol.11 No.2** **November – December 2023**

# वारसा कोल्हापूरचा - कोल्हापूर वस्तुसंग्रहालय (टाउन हॉल)

**डॉ. शिवाजी दत्तात्रय जाधव**
*सहाय्यक प्राध्यापक,*
*श्री शहाजी छत्रपती महाविद्यालय, कोल्हापूर*
*Corresponding Author – डॉ. शिवाजी दत्तात्रय जाधव*
**DOI - 10.5281/zenodo.20505210**

कोल्हापूर हे महाराष्ट्रातील प्राचीन, ऐतिहासिक आणि सांस्कृतिक परंपरेने समृद्ध असे एक महत्त्वपूर्ण शहर म्हणून ओळखले जाते. प्राचीन परंपरेची साक्ष देणाऱ्या या नगरीला धर्म, राजकारण, कला-संस्कृती आणि समाजजीवन यांच्या अनेक अंगांनी घडलेला समृद्ध वारसा लाभला आहे. प्राचीन काळापासून "करवीर क्षेत्र" म्हणून ओळखल्या जाणाऱ्या कोल्हापूरने महाराष्ट्राच्या इतिहासात तसेच भारतीय सांस्कृतिक परंपरेत एक वेगळे स्थान निर्माण केले आहे. भक्ती, अध्यात्म, लोकपरंपरा आणि राजकीय वैभव यांचा सुंदर संगम येथे आढळतो. कोल्हापूरच्या इतिहासाची मुळे अत्यंत प्राचीन काळापर्यंत पोहोचतात. ब्रह्मपुरीसारख्या पुरातत्त्वीय स्थळांमधून येथे प्राचीन संस्कृती अस्तित्वात असल्याचे पुरावे मिळतात. पुढे शिलाहार, चालुक्य, यादव, बहमनी, आदिलशाही आणि मराठा राजवटींच्या काळात या प्रदेशाचा राजकीय व सांस्कृतिक विकास झाला. विशेषतः छत्रपतींच्या कारकीर्दीत कोल्हापूर संस्थानाने सामाजिक, शैक्षणिक आणि सांस्कृतिक क्षेत्रात महत्त्वपूर्ण कार्य केले. त्यामुळे कोल्हापूरचा इतिहास केवळ राजकीय घटनांपुरता मर्यादित नसून तो सामाजिक परिवर्तन आणि सांस्कृतिक प्रगतीचा साक्षीदार म्हणूनही महत्त्वाचा ठरतो. या प्रदेशात प्राचीन देवस्थाने, भव्य किल्ले, राजवाडे, वस्तुसंग्रहालये तसेच विविध कला आणि सांस्कृतिक परंपरांचा सुंदर संगम पाहायला मिळतो. श्री महालक्ष्मी (अंबाबाई) मंदिर, जोतिबा देवस्थान आणि पोहाळे लेणी ही धार्मिक स्थळे कोल्हापूरच्या श्रद्धा, भक्ती आणि अध्यात्मिक परंपरेचे प्रतीक आहेत. देशभरातून लाखो भाविक येथे दर्शनासाठी येतात आणि त्यामुळे कोल्हापूरला एक महत्त्वाचे तीर्थक्षेत्र म्हणूनही ओळख मिळाली आहे. त्याचप्रमाणे पन्हाळा किल्ला, विशाळगड, टाऊन हॉल वस्तुसंग्रहालय आणि न्यू पॅलेस वस्तुसंग्रहालय यांसारख्या ऐतिहासिक वास्तूंमधून कोल्हापूरच्या गौरवशाली इतिहासाचे दर्शन घडते. या वास्तू त्या काळातील स्थापत्यकला, लष्करी व्यवस्था, राजकीय सामर्थ्य आणि सांस्कृतिक वैभव यांची साक्ष देतात. त्यामुळे कोल्हापूरचा ऐतिहासिक वारसा हा महाराष्ट्राच्या इतिहासातील एक महत्त्वाचा अध्याय मानला जातो. याशिवाय कोल्हापूरचा सांस्कृतिक वारसाही अत्यंत समृद्ध आहे. चित्रपट आणि नाट्यपरंपरा, संगीत आणि चित्रकला, तसेच राजेशाही दसरा उत्सव यांसारख्या परंपरांमुळे कोल्हापूरची

सांस्कृतिक ओळख अधिक वैशिष्ट्यपूर्ण झाली आहे. मराठी चित्रपटसृष्टीच्या प्रारंभीच्या घडामोडींमध्ये कोल्हापूरने महत्त्वपूर्ण भूमिका बजावली. तसेच नाट्यकला, संगीत आणि चित्रकलेच्या क्षेत्रातही येथे अनेक नामवंत कलाकार घडले. या सर्व कलापरंपरांमुळे कोल्हापूरचे सांस्कृतिक जीवन अधिक समृद्ध झाले आहे.अशा प्रकारे धार्मिक, ऐतिहासिक आणि सांस्कृतिक या तिन्ही अंगांनी कोल्हापूरचा वारसा अत्यंत व्यापक आणि समृद्ध आहे. प्राचीन देवस्थाने, ऐतिहासिक वास्तू, कला-संस्कृती आणि लोकपरंपरा यांच्या माध्यमातून या शहराच्या वैभवशाली परंपरेचे दर्शन घडते. त्यामुळे “वारसा कोल्हापूरचा- टाऊन हॉल वस्तुसंग्रहालय” संशोधन पेपरमध्ये या दृष्टीने येथील विविध कलाकृतींच्या माध्यमातून या प्रदेशाच्या समृद्ध इतिहासाचे, सांस्कृतिक वैभवाचे आणि परंपरांच्या सातत्याचे व्यापक चित्र आपल्या समोर उभे राहते.

**कोल्हापूर वस्तुसंग्रहालय (टाउन हॉल):**

कोल्हापूर वस्तुसंग्रहालय (टाउन हॉल) हे कोल्हापूरच्या ऐतिहासिक व सांस्कृतिक वारशाचे जतन करणारे एक महत्त्वपूर्ण केंद्र आहे. कोल्हापूरला प्राचीन काळापासून समृद्ध असा ऐतिहासिक आणि सांस्कृतिक वारसा लाभला आहे. या वारशातील विविध पुरातत्त्वीय वस्तू, शिल्पकला, चित्रकला, शस्त्रे तसेच नाणेसंग्रह यांचे जतन आणि संवर्धन या संग्रहालयात करण्यात आले आहे. त्यामुळे कोल्हापूरच्या समृद्ध ऐतिहासिक वारशाचे आणि प्राचीन संस्कृतीचे जिवंत दर्शन येथे घडते. संशोधक, विद्यार्थी आणि पर्यटकांसाठी हे संग्रहालय इतिहास आणि कलेचा अभ्यास करण्यासाठी एक महत्त्वपूर्ण केंद्र ठरते. येथे जतन केलेल्या वस्तूंतून कोल्हापूरच्या भूतकाळातील जीवनपद्धती, कला, संस्कृती आणि परंपरा यांची माहिती मिळते. कोल्हापूरच्या परंपरा, कला आणि ऐतिहासिक वारशाचे जतन व संवर्धन करण्यामध्ये या वस्तुसंग्रहालयाची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे. त्यामुळे कोल्हापूरच्या ऐतिहासिक आणि सांस्कृतिक वारशात टाऊन हॉल वस्तुसंग्रहालयाला विशेष स्थान प्राप्त झाले आहे.

कोल्हापूरच्या या वारशाचा शोध घेण्यासाठी इ.स. १९४५–४६ मध्ये डेक्कन कॉलेज रिसर्च इन्स्टिट्यूट मार्फत ब्रह्मपुरी येथे उत्खनन करण्यात आले, ज्यातून अनेक दुर्मिळ पुरातत्त्वीय अवशेष सापडले. या ठेव्याचे जतन व प्रदर्शन करण्यासाठी इ.स. १९४६ मध्ये कोल्हापूर वस्तुसंग्रहालयची स्थापना झाली. वाढत्या संग्रहामुळे इ.स. १९४९ मध्ये ते टाऊन हॉल येथे हलविण्यात आले. स्वातंत्र्यानंतर ते मुंबई सरकारच्या पुराभिलेखागार विभागाकडे गेल आणि इ.स. १९७२ पासून महाराष्ट्र शासनाच्या पुरातत्त्व व संग्रहालये विभागाच्या अखत्यारीत कार्यरत आहे.४

**वस्तुसंग्रहालयातील विविध वस्तू:**

कोल्हापूर शहराच्या मध्यवर्ती भागात असलेली ही सुंदर इमारत इ.स. १८७६ ला ८०,००० रुपये खर्च करून बांधण्यात आली. या वास्तूची ओळख "टाउन हॉल" या नावाने आहे. या वास्तूची रचना मेजर मॅन्ट या ब्रिटिश वास्तुरचनाकाराने केली आहे. या वास्तूची रचना "गॉथिक" शैलीची आहे. या गॉथिक शैलीचे वैशिष्ट्य म्हणजे दोन मनोरे आणि

निमुळते छप्पर हे होय. टाउन हॉलमध्ये मोठे सभागृह आहे. या मध्यवर्ती सभागृहाच्या दोन्ही बाजूस दोन खोल्या असून त्या मुख्य सभागृहाच्या प्रशस्त अशा व्हरांड्याने जोडलेल्या आहेत. टाउन हॉलच्या दर्शनी भागी एक आकर्षक द्वारमंडप आहे. त्याच्यावर गच्ची असून ती सभागृह आणि सज्जाला जोडलेली आहे. सभागृहात प्रवेश करण्यासाठी कमान असलेला लाकडी दरवाजा आहे. इमारतीच्या सभोवताली सुंदर अशी बाग आहे. अशा या सुंदर वास्तूमध्ये कोल्हापूर वस्तुसंग्रहालय आहे. या वस्तुसंग्रहालयाची मांडणी विविध विभागामध्ये केलेली आहे. ती पुढीलप्रमाणे -

**शिल्पाकृतींचे दालन:**

कोल्हापूर वस्तुसंग्रहालयामध्ये शिल्पाकृती विभागाचे मोठे दालन आहे. येथे कोल्हापूर परिसरातील मध्ययुगीन शिल्पांचे उत्कृष्ट नमुने प्रदर्शित केले आहेत. बहुतेक शिल्पे ११ व्या व १२ व्या शतकातील आहेत.या दालनातील विष्णूची काळ्या दगडातील मूर्ती विशेष उल्लेखनीय आहे. तिच्या मागे कीर्तिमुख असून हातात शंख, चक्र, पद्म व गदा आहे. ही मूर्ती बेळगाव जिल्ह्यातील रायबाग येथून आणली आहे. तसेच येथे चंद्राचे सुंदर शिल्प आहे. गोलाकार चंद्रबिंबात चंद्रदेवाचे मस्तक कोरलेले असून बाजूस चंद्राच्या १६ कला आणि वाहन म्हणून काळवीट दर्शविले आहे. तज्ज्ञांच्या मते हे शिल्प १० व्या शतकातील आहे. मदन देवतेची मूर्तीही आकर्षक असून करंडमुकुट व विविध अलंकारांनी सजलेली आहे. डाव्या खांद्यावर धनुष्य व हातात बाण दाखविला असून त्यावर सहा अप्सरांच्या आकृती आहेत. दालनात नरसिंहाच्या दोन मूर्ती असून त्या १२ व्या शतकातील आहेत. त्यापैकी एक लहान आकाराची असून तिच्यावरील कोरीव काम विशेष उल्लेखनीय आहे.प्रस्तुत संग्रहालयात बासरी वाजवित असलेली श्रीकृष्णाची मूर्ती असून ती महालक्ष्मी देवालयातील मणिकर्णिका कुंडात मिळाली आहे. येथे लक्ष्मीनारायणाची मूर्ती, मध्ययुगीन राममूर्ती (मंगळवार पेठ), तसेच १० व्या शतकातील उमा-महेश्वर मूर्ती आहे. उमा-महेश्वर शिल्पात शिव नंदीवर बसलेला असून पार्वती शेजारी आहे; शिवाच्या हातात त्रिशूल व नाग आहे. याशिवाय नृत्यात मग्न असलेली नटराजाची अंशतः भग्न मूर्तीही येथे प्रदर्शित आहे.

प्रस्तुत दालनात शिवलिंग, सूर्यदेवता, नारद, जैन तीर्थंकर, यक्ष-यक्षिणी, गणेश, महिषासुरमर्दिनी व स्कंद यांच्या मूर्ती आहेत. येथे 'वीरगळ' देखील प्रदर्शित केले आहेत. सार्वजनिक हितासाठी किंवा रक्षणार्थ प्राणार्पण केलेल्या वीरांच्या स्मरणार्थ उभारलेल्या दगडी स्मारकांना वीरगळ म्हणतात. या वीरगळ शिलाहार-यादवकालीन असून १ ते ५ फूट उंचीच्या आहेत. प्रामुख्याने त्यांत शिवलिंगपूजा दर्शविली जाते; मात्र येथे देवीपूजेचे दृश्यही आढळते, ज्यावर स्थानिक महालक्ष्मी श्रद्धेचा प्रभाव दिसतो. तसेच तीन सती स्मारके (दोन मध्ययुगीन, एक मराठाकालीन) येथे आहेत. याशिवाय नक्षीदार खांब, देवालयाचे चौकटीचे भाग, द्वारपाल, नृत्यांगना व हत्तीची शिल्पेही प्रदर्शित केली आहेत.

**पुरातत्त्व वस्तू दालन:**

कोल्हापूरला प्राचीन वारसा लाभलेला असून मौर्य ते शिलाहार राजवटींचे अवशेष ब्रह्मपुरी

उत्खननात (इ.स. १९४५–४६) सापडले. त्यातील अनेक वस्तू पुरातत्त्व दालनात ठेवलेल्या आहेत. सातवाहन कालातील खापरे येथे विशेषतः प्रदर्शित असून त्यांचा पातळपणा व चमकदारपणा हे वैशिष्ट्य आहे. याशिवाय तांबड्या पॉलिशची (रोमन) भांडी, तोटीचे मातीचे भांडे, नक्षीकाम केलेली मातीची भांडी तसेच लोखंडी व तांब्याच्या नित्योपयोगी वस्तूही येथे प्रदर्शित आहेत. या दालनात कोल्हापूर व रोम यांच्यातील संबंधाचा पुरावा म्हणून पंचधातूची "पोसायडन" (पोसीडॉन) शिल्पाकृती उल्लेखनीय आहे. ही ग्रीक समुद्रदेवतेची मूर्ती १४.३ से.मी. उंच असून हातातील त्रिशूल गायब असला तरी चेहऱ्यावरील भाव वास्तवदर्शी आहेत. याचप्रमाणे हत्तीवर आरूढ चार व्यक्तींचे ५ से.मी. उंच ब्रॉन्झ शिल्पही येथे आहे. हे सातवाहनकालीन धातुशिल्पकलेचे उत्कृष्ट उदाहरण मानले जाते.या दालनात आरसे, घंटा, दिवे, दौती, खेळातील गाड्या तसेच पंचधातू व इतर नित्योपयोगी धातूंच्या वस्तू (हंडे, कढई, पातेली, घमेल्या इ.) प्रदर्शित आहेत. येथे मातृदेवतेची मूर्ती विशेष उल्लेखनीय असून तिचे नाक उठावदार, स्तन ठळक व नाभी खोल दर्शविली आहे. तसेच ब्रह्मपुरी उत्खननातील सातवाहन व उत्तर सातवाहन काळातील घरांचे अवशेष, मातीची भांडी, मणी, बांगड्या इत्यादी वस्तू प्रदर्शित केल्या आहेत. शिलाहार व बहमनी कालखंडातील खापरे, शेतीसाहित्य (लोखंडी कुऱ्हाड, फाळ, कोयता) व बाणांची टोकेही येथे पाहावयास मिळतात. प्रस्तुत दालनात तीन ताम्रपट प्रदर्शित आहेत. त्यामध्ये राष्ट्रकूट राजा अमोघवर्षदेव (शके ८५२/इ.स. ९३०) यांचा रुकडी गाव इनामाचा उल्लेख असलेला ताम्रपट, होयसळ राजा महमंडलेश्वर (शके ९२५/इ.स. १००३) यांचा देणग्यांचा उल्लेख असलेला ताम्रपट आणि शिलाहार राजा गांदरादित्य (शके १०४८) यांचा देवालय देणगीविषयक ताम्रपट समाविष्ट आहे. याशिवाय सातवाहन ते बहमनी कालातील विविध मणी, सातवाहनकालीन बांगड्या (शंख, हाडे, हस्तिदंत) तसेच सातवाहन ते ब्रिटिश कालखंडातील नाण्यांची मांडणी येथे केली आहे.

**संकिर्ण कलाकृती दालन:**

कोल्हापूर संग्रहालयातील संकिर्ण कलाकृती विभागात सावंतवाडीहून मिळालेल्या अनेक कलावस्तू प्रदर्शित आहेत. यामध्ये जरीकाम केलेले पंखे, चंदनाच्या लाकडातील कृष्ण, विष्णू, शिव, गणेश, महिषासुरमर्दिनी व गौरी यांच्या मूर्ती, तसेच भेंडीपासून तयार केलेल्या कलाकृतींचा समावेश आहे. गुलाबाच्या फुलांची नक्षी असलेली अलंकारिक फुलदाणी, नक्षीदार कुंपण व मानवी आकृत्या हे विशेष आकर्षण आहे. तसेच माती ओलसर असतानाच कोरीव काम केलेली भांडी, इ.स. १८८८ च्या पुणे प्रदर्शनातील रंगीत भांडी आणि कोल्हापूर शासकीय विश्रामगृहामधून मिळालेल्या २७ इंच उंचीच्या नक्षीकाम असलेल्या फुलदाण्याही येथे पाहावयास मिळतात. प्रस्तुत संकिर्ण कलाकृती विभागात काष्ठशिल्प (लाकडी शिल्प) कोरलेल्या वस्तू आहेत. सावंतवाडी येथे बनवलेले हिंदू स्त्री, ब्राह्मण लेखनिक व मराठा शिपाई यांची तीन काष्ठशिल्पे प्रदर्शित केली आहेत. या संग्रहात काही संकिर्ण वस्तू एकत्रित मांडल्या आहेत. यामध्ये दगडी चिलम, वाळूचे घड्याळ, पितळी चुनेची डबी, पंचांग,

विविध पोशाख, दगडी तांबे, पेला, दात, दगडी संदूक, मोठी घंटा, गरुड ध्वज इत्यादींचा समावेश आहे. यातील चिमाजी अप्पांनी (इ.स. १७३८-४०) वसई जिंकल्यानंतर पोर्तुगीजांकडून मिळालेल्या तीन घंटांपैकी एक घंटा महालक्ष्मी देवालयास अर्पण केली होती. ती घंटा महालक्ष्मीच्या घाटी दरवाजावर ठेवलेली होती. तिला तडा गेल्यानंतर ही घंटा संस्थानाकडून संग्रहालयास मिळाली.

**चित्र कलाकृती विभाग:**

कोल्हापूरमध्ये जन्मलेल्या नामवंत चित्रकारांचा वारसा जतन करण्यासाठी संग्रहालयात इ.स. १९५३ मध्ये चित्रकलाकृती विभाग सुरू करण्यात आला. येथे आबालाल रहिमान यांच्या चार चित्रकलाकृती प्रदर्शित असून त्यातील "बोअर हंटिंग" या चित्राला इ.स. १९२९ मध्ये सुवर्णपदक मिळाले. या चित्रात शिवाजी महाराज घोड्यावरून डुकराची शिकार करताना दर्शविले आहेत. तसेच पंचगंगा नदीचे एक निसर्गचित्रही येथे पाहावयास मिळते. प्रस्तुत दालनात बाबुराव पेंटर यांच्या प्रसिद्ध चित्रकलाकृती प्रदर्शित आहेत. "जलवाहिनी" या चित्रात संध्याकाळच्या प्रकाशात नदीतील प्रतिबिंबाचे मोहक दृश्य साकारले आहे, तर "उष:काल" मध्ये देवपूजेसाठी पाणी नेणारी महाराष्ट्रीय महिला आणि पहाटेचे वातावरण प्रभावीपणे दर्शविले आहे.

प्रस्तुत चित्रकलाकृती दालनात बाबा गजबरे यांच्या कुंचल्यातून साकार झालेले १९६७ मधील पंडित जवाहरलाल नेहरू यांचे एक अप्रतिम व्यक्तिचित्र संग्रहालयात आहे. याचबरोबर गणपतराव वडणगेकर यांच्या चार चित्रकृती कोल्हापूर वस्तुसंग्रहालयामध्ये आहेत. त्यातील दोन जलरंगातील निसर्गचित्रे आहेत. यामध्ये राजगडावरील दरवाज्याचे त्यांच्या निसर्गचित्रामध्ये त्यांचे जलरंगावरील प्रभुत्व स्पष्ट होते. तसेच गोसाव्याचे व्यक्तिचित्र वैशिष्ट्यपूर्ण आहे. कोल्हापूर वस्तुसंग्रहालयामध्ये रा.शि. गोसावी (इ.स. १९२२-८१) यांची तीन चित्रकलाकृती प्रदर्शित केलेल्या आहेत. यामध्ये इ.स. १९६६ मध्ये तैलरंगात चित्रित केलेले "इंदुमती" हे व्यक्तिचित्र, इ.स. १९८९ मध्ये जलरंगातील "हटस" व "समुद्र" ही निसर्गचित्रे यांचा समावेश आहे. प्रस्तुत दालनामध्ये दत्तोबा दळवी यांनी रंगविलेली "रायगडावरील शिवछत्रपतींची समाधी" हे निसर्गचित्र प्रदर्शित केलेले आहे. या दालनामध्ये प्रसिद्ध निसर्गचित्रकार सय्यद अब्दुलगफार महमद गौस काझी (१९२२-२००२) यांची निसर्गचित्रे संग्रहालयात आहेत.

तसेच प्रस्तुत दालनामध्ये बाबुराव सडवेलकर (इ.स. १९२८-२०००) यांच्या जलरंगातील दोन चित्रकलाकृती आहेत. यामध्ये १९६६ मधील व्यक्तिचित्र व इ.स. १९५१ मध्ये काढलेले "बॉम्बे स्ट्रीट" हे निसर्गचित्र समाविष्ट आहे. सुधा मदन-उपळेकर यांच्या कुंचल्यातून साकार झालेले एक व्यक्तिचित्र व एक लहान मुलीचे चित्र प्रदर्शित केले आहे. चांगदेव शिरगावकर (१९१२-८९) यांचे १९५२ सालचे पंचगंगा नदीच्या किनाऱ्यावरील चित्र चांदण्यांच्या रात्रीचे विहंगम निसर्गदृश्य दाखविते. त्याचबरोबर के.व्ही. गुळवणी यांचे जलरंगातील "संध्यामठ" हे चित्र देखील प्रसिद्ध आहे. कोल्हापूर वस्तुसंग्रहालयामध्ये रवींद्र मेस्त्री (१९२८-९५) यांच्या कुंचल्यातून साकार झालेली

तैलरंगातील व्यक्तिचित्रे आहेत. "सुलू", "सुधा" "सुचेता" अशी या व्यक्तिचित्रांची नावे आहेत. अशाप्रकारे या दालनामध्ये कोल्हापूरातील नामवंत चित्रकारांच्या कलाकृती प्रदर्शित केल्या आहेत.

**शस्त्र विभाग:**

कोल्हापूर वस्तुसंग्रहालयामध्ये इ.स. १९५५ मध्ये कागल, निपाणी, नाशिक, सावंतवाडी, अलाहाबाद इ. ठिकाणांहून मिळालेल्या शस्त्रांचा एक स्वतंत्र विभाग करण्यात आला आहे. या संग्रहालयामध्ये ३९ तलवारी प्रदर्शित केल्या आहेत. यातील वीस तलवारी बाकदार आहेत व उरलेल्या सरळ पात्यांच्या आहेत. दोन तलवारींच्या मुठीवर सोन्याचा मुलामा दिलेला आहे. त्यातील एका तलवारीवर घोड्यांच्या उंटांच्या, पालखीच्या आकृत्या कलात्मक रीतीने कोरलेल्या आहेत. या संग्रहालयामध्ये एकूण पाच तोफा आहेत. यातील तीन मोठ्या आकाराच्या असून दोन लहान आहेत. मोठ्या तोफांपैकी एक तोफ पन्हाळा तर दुसरी रत्नागिरी जिल्ह्यातील फणसवणे गावात मिळाली आहे. यातील दोन तोफा कागलहून आणल्या आहेत. या संग्रहालयामध्ये चार भाले असून ते सर्व लांब दांड्याचे आहेत. प्रस्तुत दालनामध्ये २६ बंदुका प्रदर्शित केलेल्या आहेत. यापैकी सहा बंदुका इ.स. १९३९ च्या दुसऱ्या जागतिक महायुद्धात जर्मन सैनिकांनी वापरलेल्या आहेत. या दालनामध्ये दोन बंदुकांची तोंडे पितळी आहेत. या विभागामध्ये तीन ढाली आहेत. ढाल ही युद्धातील आवश्यक बाब होय. ढाल मुख्यतः हत्तीच्या चामड्याची तसेच गेंड्याचे, बैलाचे चामडे, कासवाची पाठ, बांबू, वेत व पोलादी पत्रा, तांबे, पितळ यांपासून बनवितात. अशा प्रकारच्या ढाली प्रदर्शित केल्या आहेत. “मांडू” नावाचे शस्त्र या संग्रहालयामध्ये आहे. हा ढालीचा एक दुर्मीळ प्रकार आहे.या विभागात जर्मन बनावटीची चार शिरस्त्राणे आहेत. तसेच सावंतवाडीहून मिळालेले गुप्ती नावाचे वैशिष्ट्यपूर्ण हत्यार आहे.

एकूणच, कोल्हापूरचा ऐतिहासिक व सांस्कृतिक वारसा अत्यंत समृद्ध आणि बहुआयामी आहे. या वारशाचे जतन व संवर्धन करण्यात कोल्हापूर वस्तुसंग्रहालय (टाउन हॉल) महत्त्वाची भूमिका बजावते. येथे जतन केलेल्या पुरातत्त्वीय वस्तू, शिल्पकला, चित्रकला आणि शस्त्रसंग्रहातून कोल्हापूरच्या इतिहासाची तसेच ऐतिहासिक व सांस्कृतिक परंपरेची ओळख होते. हे संग्रहालय संशोधक, विद्यार्थी आणि पर्यटकांसाठी ज्ञानाचे एक महत्त्वपूर्ण केंद्र ठरले आहे. येथे जतन केलेल्या वस्तूंमधून कोल्हापूरच्या समृद्ध ऐतिहासिक वारशाचे दर्शन घडते. त्यामुळे कोल्हापूरच्या ऐतिहासिक आणि सांस्कृतिक वारशाचे जतन, संवर्धन आणि पुढील पिढ्यांपर्यंत पोहोचविण्यात या संग्रहालयाचे योगदान अत्यंत महत्त्वपूर्ण आहे.

**संदर्भ:**

१. देगलूरकर, (डॉ.) गो. ब. व इतर (संपा.), *युगयुगीन करवीर इतिहास दर्शन*, भारतीय इतिहास संकलन समिती, कोल्हापूर, 2010

२. सी. शिवराममूर्ती, भारतीय संग्रहालयाची निर्देशिका, दिल्ली, 1960.

३. दै. पुढारी, 7 फेब्रुवारी, 1956, पृ. 4.

४. शिखरे सुरेश वसंत, कोल्हापूर शहरातील वस्तुसंग्रहालयांच्या पर्यटनाच्या संदर्भातून ऐतिहासिक अभ्यास, एम.फिल. अप्रकाशित शोधप्रबंध, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर, 2008.
५. Najappa, V., Kolhapur, The Publicity Office, Kolhapur State, 1948.
६. चौधरी कि. का. (संपा.), *महाराष्ट्र राज्य गॅझेटियर : कोल्हापूर जिल्हा*, दर्शनिका विभाग, महाराष्ट्र शासन, मुंबईपवार, ना. वा., कोल्हापूर वस्तुसंग्रहालय मार्गदर्शिका, पुरातत्त्व विभाग, महाराष्ट्र शासन, 1971
७. दै. लोकसत्ता, पुणे आवृत्ती, 31 मे 2009.
८. जोशी, (डॉ.) नी. पु., भारतीय मूर्तिशास्त्र, नागपूर, 1979.
९. दै. लोकसत्ता, पुणे आवृत्ती, 31 मे 2009.
१०. साळुंखे नीरज, दैत्य बळी व कुतुंबदेश, महाराष्ट्र लोकवाङ्मय प्रकाशन, द्वितीय आवृत्ती, सातारा, 2007.
११. पाटील, (डॉ.) गौतम; कठारे, (डॉ.) अनिल, सातवाहनकालीन भौतिक संस्कृती, पूनम प्रकाशन, कंधार, 2011.
१२. देव, शां. भा., महाराष्ट्रातील उत्खनने, पब्लिकेशन्स डिव्हिजन, माहिती व नभोवाणी मंत्रालय, भारत सरकार, दिल्ली, 1962.
१३. दोशी, (डॉ.) शरयू (संपा.), महाराष्ट्र, मुंबई, 1985.
१४. देव, शां. भा., महाराष्ट्र : एक पुरातत्त्वीय समालोचन, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई, 1968.
१५. Sankalia (Dr.) H. D.; Dikshit (Dr.) M. G., Excavations at Brahmapuri, Poona, 1952.
१६. दै. पुढारी, 7 फेब्रुवारी 1958.
१७. भगत रा. तु., रंगसम्राट आबालाल रहिमान, चैतन्य प्रकाशन, कोल्हापूर, 1943.
१८. देसाई, (डॉ.) सु. के., कोल्हापूरच्या चित्रशिल्प परंपरेचा 150 वर्षांचा इतिहास, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर, 1997.
१९. जाधव श्यामकांत, रंगचित्रकारांचे, वस्तुगंध प्रकाशन, कोल्हापूर, 2002.
२०. मांडरे सूर्यकांत, कोल्हापुरी साज, पुरंदरे प्रकाशन, प्रथमावृत्ती, कोल्हापूर, 1993.
२१. मगदूम संजीव, रवींद्र मेस्त्री : एक कलंदर कलावंत, मुक्ता पब्लिशिंग हाऊस, प्रथमावृत्ती, 2007.
२२. जाधव गिरीश; पवार, (डॉ.) जयसिंग; विभुते, (डॉ.) भालबा (संपा.), मराठ्यांच्या शस्त्रास्त्रांचे इतिहासाच्या मांडणीतले स्थान, महाराष्ट्र इतिहास मांडणी व पुनर्मांडणी, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर, 2011.
२३. राजरत्न, (डॉ.) माणिकराव, प्रताप शस्त्रनगर, राजरत्न मोरेश्वर (प्रकाशन), बडोदा, 1949.
२४. कोल्हापूर वस्तुसंग्रहालय अभिप्राय नोंद वही.